# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २४/०१/२०१८

## *कुंजेमर्का गावकऱ्यांनी केली ०३ भरमार रायफल जमा*

आज दिनांक २४/०१/२०१८ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी हेडरी, श्री. शशिकांत भोसले सा़ो. यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली नक्षलदृष्टया अतिसंवेदनशिल अशा मौजा कुंजेमर्का गावाची ग्राममिटिंग घेतली असता त्यांना त्यांच्याकडील भरमार रायफल जमा करण्याचे आव्हान केले असता त्यांनी त्यांच्याकडील ०३ भरमार रायफल व ०१ भरमार रायफल चे बॅरेल असे साहित्य मौजा कुंजेमर्का येथील प्रभारी पोलीस अधिकारी पोउपनि योगेश दाभाडे यांच्या समोर जमा करून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामाविष्ठ होण्याचा निर्णय घेतला.

अतिदुर्गम अशा गावातून भरमार रायफल जमा झाल्याने ग्रामीण जनतेत लोकशाही बद्दल व पोलीसांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याचे दिसत आहे. तसेच पोमकेच्या वतीने भरमार रायफल जमा करणाऱ्या ग्रामस्थांना पुष्पगुच्छ देऊन व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पोमके गट्टा (जांभीया) चे प्रभारी अधिकारी योगेश दाभाडे पोउपनि, पोउपनि अतुल खंडारे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. इतर गावकऱ्यांनी सुध्दा या गोष्टींचा आदर्श घेवून नक्षलविरोधी अभियानात सामिल होण्याचे आवाहन मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सा़ो. यांनी केले आहे.


पोलीस मदत केंद्र गट्टा.
पो. स्टे. एटापल्ली जि. गडचिरोली.